सकाळ
TODAY
पिंपरी-चिंचवड, मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४




कॉलेज कट्टा

# ‘फार्मासिस्ट’बाबत जनजागृती

■ श्रुती गांधी
(रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी, चिंचवड)

श्री जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसी चिंचवड येथे जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी फार्मासिस्टची शपथ घेतली. डेंगीबाबत जनजागृतीसाठी प्रहसन (स्किट) सादर केले. मोहननगर भागात फेरी काढून विविध विषयांवर जनजागृती केली. राज्यस्तरीय ई-रांगोळी स्पर्धा घेतली. त्यात ६० कॉलेजमधील १२५ विद्यार्थी सहभागी आले. रसिकलाल एम. धारिवाल कॉलेज ऑफ फार्मसीच्या पायल कांबळे (प्रथम), पीव्ही पॉलिटेक्निक एसएनडीटीची ट्विंकल राठोड (द्वितीय), संजीवनी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची आंचल गेहोट (तृतीय) यांनी पारितोषिक मिळवले. प्रा. सुचिता खोत यांनी समन्वयक होत्या. फार्मासिस्ट म्हणून योगदान दिलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान केला. प्रा. संध्या लंके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्राचार्य डॉ. सचिन फेगडे यांनी फार्मासिस्ट यांच्या कार्याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. कल्याणी भालेकर यांनी केले. आभार प्रा. हर्षदा पाटील यांनी मानले. संस्थेचे ऑनररी जनरल सेक्रेटरी ॲड्व्होकेट राजेंद्रकुमार मुथा यांनी अभिनंदन केले.

RASIKLAL M. DHARIWAL COLLEGE OF PHARMACY ★ D-PHARM Chinchwad Station, Pune - 411019.

PRINCIPAL
RASIKLAL M. DHARIWAL
COLLEGE OF PHARMACY
Chinchwad Station, Pune-411 019